Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 4 | Oct - 2015

# पेशवेकालीन शुद्र जातीतील लग्नाचे प्रकार

**डॉ. संतोष अ. जेठीथोर**
**सहायक प्राध्यापक इतिहास विभाग , डी.आर.माने महाविद्यालय,कागल.**

## प्रस्तावना:



प्राचीन काळापासून भारतीय समाज हा परंपरावादी जीवन जगत आला होता. या पुराणमतवादी विचाराला पुन्हा चालना पेशवा काळात मिळाली. या काळात पूर्वीच्या ज्या परंपरा होत्या त्याचे काटेकोर पालन करण्यात येवू लागले. यामुळे समाजात मोठयाप्रमाणात अंधश्रद्धा निर्माण झाली. या त्यांच्या धोरणामुळे समाजाची प्रगती न होता अधोगतीच मोठयाप्रमाणात झाली. पेशवेकालीन समाजात स्त्रीयांना दुय्यम दर्जाची वागणुक दिली जात होती. समाजात सती प्रथा, बालविवाह, जरठकुमारीविवाह, बहुपत्नीत्व, इ. सारख्या प्रथा रुढ होत्या.

सामाजिक जीवनात विवाह संस्कार महत्वाचा मानला जातो. समाजात विवाहाचे वेगवेगळे प्रकार अस्तित्वात होते. विवाहाच्या ज्या पद्धती होत्या त्यापैकी उच्च जातीतील विवाह व शुद्र जातीतील विवाह या शुद्र जातीमध्ये विवाहाचे काही प्रकार होते. मी माझ्या शोध निबंधात याकाळात शुद्र जातीतील लोकात विवाह कसे लावले जात होते त्यांच्या विवाह करण्याच्या पद्धती कशा होत्या व त्यांच्यातील विवाहाचे प्रकार कोणकोणते होते. हे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाकरिता मी पेशवा दप्तर, पेशवा रोजनिशी, इ. साधनाचा आधार घेतला आहे.

## सामाजिक पार्श्वभूमी:

पेशवेकालीन समाजाची विभागणी तीन विभागात झाली होती १. ब्राम्हण २. शुद्र आणि तत्सम (ब्राम्हणेतर) जाती ३. अतिशुद्र किंवा अस्पृश्य जाती पूर्वी ब्राम्हण व अस्पृश्य अशा दोनच जाती मानल्या जात होत्या. ब्राम्हण जाती व त्याच्या पोट जाती पुढीलप्रमाणे चित्पावन, देशस्थ, सारस्वत, चरक, कण्व,

शुद्र जातीमध्ये कुणबी, मराठा, तर अस्पृश्यामध्ये महार, मांग, चांभार या जाती आणि त्यांच्या उपजाती अस्तित्वात होत्या[१].

## शुद्र जातींची लग्ने :

पेशवेकालीन महाराष्ट्रात निरनिराळया जातीजमातीमध्ये विवाहाच्या पद्धती वेगवेगळया प्रकारचे असल्याचे दिसते. या काळातील समाजात बालविवाह, विधवा विवाह, राक्षस विवाह, असूर विवाह, इ. रुढ असल्याचे दिसते. हे विवाह प्रकार अठराव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजात अस्तित्वात होते. वरिल विवाह प्रकार हा त्या काळात कोणत्या ना कोणत्या जाती - उपजातीमध्ये अस्तित्वात असल्याचे दिसेल.

पेशवे काळात समाजामध्ये वरील विवाह पद्धती अस्तित्वात असल्या तरी एका जातीची लग्नपद्धती ही दुस-या जातीतील लग्नपद्धती होवू शकत नाही. उदा. ब्राम्हण जातीच्या लग्न पद्धती वेगळया, आदिवासी, भटक्या जातींच्या लग्न पद्धती वेगळया त्यांच्या रुढी परंपरा वेगळया असल्याचे आपणास दिसेल. व आजही आपल्या समाजात हे चित्र दिसेल.[२]

## शुद्र जातीतील लग्न प्रकार:

पेशवे काळात उच्च वर्गातील जातीबरोबर शुद्र वर्गातील जातीमध्ये लग्नाचे काही प्रकार दिसून येतात. ते पुढीलप्रमाणे

१. **पाट लावणे:** शुद्र जातीमध्ये मोठयाप्रमाणात रुढ व सर्वसामान्य असलेला लग्नप्रकार म्हणजे पाट लावणे होय. या प्रकारात सोडखत, सोडचिठ्ठी, काडीमोड, इ. गोष्टी केल्यानंतर त्या स्त्रीला पाट लावता येतो. पाट लावणे हा एक प्रकारे विवाहच होता. पण जर नवरा जिवंत असताना जर पाट लावला तर त्या संबंधित व्यक्तीला दंड आकारला जात असे. याविषयीचा एक उल्लेख सापडतो. तो असा सोनार जातीच्या एका स्त्रीने पती जिवंत असतानाच तो मृत्यु पावला असे समजून संबंधित नातवाईकांना न विचारताच तिचा पाट लावण्यात आला. याविषयीची चौकशी केली त्या स्त्रीस १०० रुपये दंड आकारण्यात आला.[३]

काही वेळेस पाट हे गैरसमजूतीतून लावले जात असत. तर काही कारणांमुळे लावले जात असत. असाच एक उल्लेख आपणास मिळतो. सासवडचा एक तेली पानिपतवर लढाईला गेला असता तो बरेच वर्षे परत आला नाही. तो मृत्यू पावला असे समजून मुलीच्या बापाच्या संमतीने दुसरे लग्न केले. परंतू काही दिवसानी पूर्वीचा नवरा परत आला. त्याने गोत बोलविले व सांगितले, ''बायको विटाळलेले भांडे आपल्या कामाचे नाही''. म्हणून पैशाची मागणी केली.[४]

दुसरे एक पाट लावण्याविषयीचे उदाहरण आपणास पहावयास मिळते. उपासमार होत आहे म्हणून शुद्र जातीतील काहींना पाट लावण्याची वेळ आल्याचे दिसते. आजही आपणास हे दिसेल दारिद्रियामुळे मुलींचे विवाह लावले जातात. यापाठिमागे कटकटीतून मुक्तता असा एक भाव असतो तर दुस-या बाजूला एक व्यक्ती संसाराला मदत करेल असा भाव असतो. उपासमारीतून झालेल्या विवाहाचे उदाहरण आपणास दिसते. ''वादी लक्ष्मण ठाकूर मौजे लोणी कालभोर याने विदित केले की, मौजे कुरण येथील ठाकरास बहिण मैनी दिली होती. त्यास तिचा दादला मयत झाला पोर झाले होते तेही मयत झाले. दादल्यास कोणी भावबंदही नाहीत पोटास मिळेना व संसार चालला पाहिजे याजकरिता तिचा पाट लावला''[५]

काही वेळेस विधवा बायकांचाही लावला जात असे ''कुशी वल्लद मल्लाप्पा तांबोळी मौजे सरसी तर्फ कुबळ याने हुजुर विदित केले की, आपली बहिण रांडाव घरी होती. ते संभाप्पा तांबोळी वस्ती मौजे येकंबे, तर्फ चिमणगांव यांनी आपले केल्यास करार केली. त्याबद्दल रुपये २०० आपणास द्यावे. याप्रमाणे केले असता त्यांनी रुपये न देता कसबे फलटण येथे माझा बाप मल्लाप्पा यास सरकारच्या वाडयात बसवून जबरदस्तीने तिशी पाट लावून घेवून गेला.''[६]

शुद्र जातीत पाट लावणारे स्त्री - पुरुष दोघेही विधूर असावेत असा नियम दिसतो. या ठिकाणी स्त्रीचा पती मृत्यू पावलेला असला पाहिजे. परंतू पुरुषाच्या बाबतीत तसे नव्हते. त्या पुरुषाची पत्नी मेलीच पाहिजे असे नाही तर त्याचे पूर्वी एक लग्न होवून बायकोस सोडचिठ्ठी दिलेली असावी. तरच लग्न करता येत असे तसेच ज्या पुरुषाची पत्नी मृत्यु पावलेली असेल अशा पुरुषास 'रंडका' तर ज्या स्त्रीचा पती मृत्यू तिला 'रंडकी' असे म्हणत. तसेच सोडचिठ्ठी झालेल्या स्त्री - पुरुषास 'लिंब उतलेली' व 'लिंब उतरलेला' असे म्हणत असत. वरील प्रकारच्याच स्त्री - पुरुषांना पुनर्विवाहाचे हक्क असत.[७]

एखादे वेळेस जात सोडून दुस-या जातीबरोबर पाट लावला जात असे परंतू कालांतराने ते उघड झाल्यास धर्मशास्त्राचा आधार घेवून पाट तोडला जात असे. अशीच एक नोंद मिळते ''विनंती उपरी सिवाजी उत्तरा कोष्टी वस्ती पुणे याने रामजी गायकवाड म्हणतो की, सिवाजीने आपण जातीचा कुणबी ऐसे सांगून माझी कन्या आपल्या लेकास करुन पाट लाविला. पुढे सिवाजी मजकूर जातीचा कोष्टी यैसे आपणास कळले. यास्तव आपली कन्या देत नाही. म्हणून सिवाजी कोष्टी म्हणतो की, रामजी गायकवाड यांची कन्या आपल्या लेकास करुन पाट लाविला तेव्हा आपण जातीचा कोष्टी ऐसे सांगत होता. परंतू त्यात साक्ष कोणाही नाही म्हणून हर दोजणाचा कजिया लागोन मनसुफी सरकारात दिली. त्यावरुन आपणास लिहिले आहे तरी येविसीचा विचार शास्त्रावरुन लेहून पाठवावे''[८]

२. **मोहतूर किंवा मुहूर्त लावणे :** शुद्र जातीत लग्न लावण्याचा हा एक प्रकार होता याविषयीच्या अनेक नोंदी आपणास मिळतात.

''गोरखोजी बिन फकीरजी जुन्नर मौजे लिपणगाव याने साहेबाचे सेवसी कतबा लिहून दिला ऐजा जे. राणू कुंभारीण पलसी कब कुटेकर इजला आधीचे घरची मुले दोघे पुत्र व कन्या एक ऐसी आहेत. रांडकी बायको आहेत ते आपण मोहर्त लाउन बायको करितो. तिचा पेसजीचा काही लढा आला तर त्याचा जाबसाल जो पडेल तो आपण सूद वारून देउ''[९]

''रामजी मसाल मौजे पाचेगांव याची लेक सताई उमर वर्षे ३५ ही म्हादजी सिपाईसिबंदी चाकरी कीले पुरंधर यासी मुहूर्त लाउन दिली होती. तो साल गुदस्ता मयत झाला. हीही सिदोजी बिन आबाजी जगताप मौजे राजेवाडी उमर वर्षे ४५ यासी मुहूर्त लावीत आहे''[१०]

**सारांश :**

एकंदर या काळात समाजात प्रामुख्याने कनिष्ठ जातीत अशा प्रकारचे विवाह होत होते. परंतू उच्च जातीत असे विवाह होत नव्हते. या काळात शुद्र जातीत होणा-या लग्नामध्ये एक गोष्ट दिसून येते की, या जातीमध्ये आर्थिक विवंचना

असल्याने या पद्धतीचे विवाह केले जात असत. कारण या वर्गाकडे आर्थिक समृद्धता नसल्याने अशा पद्धतीचा विवाह करणे भाग पडत असे. दुसरी गोष्ट म्हणजे विधवा विवाहाला या जातीमध्ये मान्यता होती. त्यामुळे त्या स्त्रीला अथवा पुरुषाला पुन्हा नव्याने जीवन सुरु करण्याची चालना मिळत असे.

## संदर्भ


१. डॉ. गवळी, पी. ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद, २०००, पृ.२५७- २५८
२. देशमुख, शारदा, शिवकालीन व पेशवेकालीन स्त्रीजीवन पृ.५६
३. ओतुरकर, रा. वि. पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार, लेख १३८
४. कित्ता, लेख १२९
५. कित्ता, लेख १४१
६. पेशवा रोजनिशी खंड ८ नोंद ८५६
७. भारत इतिहास संशोधन मंडळ, सहावे संमेलनवृत्त पृ. ५१- ५२
८. पेशवे दप्तर खंड ४३ लेख १२
९. ओतुरकर, रा. वि. पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार लेख १२५
१०. कित्ता लेख १४३